# Study Circle Career Development Institute

# AMC
# Paper 2012

**A**

Time : 2 Hrs. Marks : 200

## सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत **100** अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) (अ) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(ब) **आयोगाने ज्या विषयासाठी मराठी बरोबर इंग्रजी माध्यम विहित केलेले आहे. त्याच विषयाचे प्रश्न मराठी बरोबर इंग्रजी भाषेत देखील छापण्यात आले आहे. त्यामधील इंग्रजीतील किंवा मराठीतील प्रश्नामध्ये मुद्रणदोषांमुळे अथवा अन्य कारणांमुळे विसंगती निर्माण झाल्याची शंका आल्यास, उमेदवाराने संबंधित प्रश्न पर्यायी भाषेतील प्रश्नाशी ताडून पहावा.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची दिलेल्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरुद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

कच्च्या कामासाठी जागा / **SPACE FOR ROUGH WORK**

## व्यवस्थापन, नगररचना व कायदेविषयक ज्ञान
## दिनांक – २२–१–२०१२

१) आधी खालील विधाने विचारात घ्या :
i) तज्ज्ञांनी असे प्रतिपादन केले की कार्याचे स्वरूप आणि संदर्भ कोणताही असो, प्रशासन हे प्रशासनच असते
ii) प्रशासनाच्या तत्त्वांना सार्वत्रिक मान्यता आणि समर्पकता आहे.
आता खालील पर्यायातून योग्य उत्तराची निवड करा.
(1) (i) व ही (ii) दोन्ही सत्य आहेत परंतु (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण नाही.
(2) (i) आणि (ii) ही दोन्ही सत्य आहेत आणि (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण आहे.
(3) (i) बरोबर आहे, परंतु (ii) चूक आहे
(4) (i) चूक आहे, परंतु (ii) बरोबर आहे.

---

२) व्यवस्थापनाची १४ तत्त्वे कोणी सुचविली आहेत ?
(1) फ्रेडरिक टेलर (2) ॲलन (3) हेन्री फेयॉल (4) हेरॉल्ड कून्टझ्

---

३) यादी आणि यादी यांची जोडी लावा :

| *यादी I –प्रशासनाच्या तत्त्वांचा विचार मांडणारी प्रकाशने* | *यादी II –वर्ष* |
|---|---|
| i) हेन्री फेयॉल यांचे 'इंडस्ट्रियल ॲण्ड जनरल मॅनेजमेंट' | १९३७ |
| iii) मेरी पी.फॉलेट यांचे 'क्रिएटिव्ह एक्सपिरिअन्स' | १९१६ |
| iii) गुल्लिक आणि आर्विक यांचे 'पेपर्स ऑन दि सायन्स ऑफ ॲडमिनिस्ट्रेशन' | १९३९ |
| iv) मूने आणि रिले यांचे 'ऑनवर्ड इंडस्ट्री' | १९२४ |
| | १९३१ |

| | | | |
|---|---|---|---|
| (1) i) १९१६ | ii) १९३१ | iii) १९२४ | iv) १९३७ |
| (2) i) १९१६ | ii) १९२४ | iii) १९३७ | iv) १९३१ |
| (3) i) १९१६ | ii) १९३७ | iii) १९३९ | iv) १९२४ |
| (4) i) १९१६ | ii) १९३९ | iii) १९२४ | iv) १९३७ |

---

४) कामे करवून घेण्याच्या प्रशासकाच्या हक्कास काय म्हणतात ?
(1) स्वातंत्र्य (2) स्वायत्तता (3) सत्ता (4) अधिकार

---

५) महापालिकेला तीन प्राधिकारी असतात.
(1) नगरपरिषद, स्थायी समिती, महापौर
(2) नगरपरिषद, महापौर, उपमहापौर
(3) नगरपरिषद, महापौर, आयुक्त
(4) महानगरपालिका नगरपरिषद, स्थायी समिती, आयुक्त

---

६) नोकरशाहीची संकल्पना कोणी विकसित केली ?

(1) चेस्टर बर्नार्ड (2) मॅक्स वेबर (3) कार्ल मार्क्स (4) रॉबर्ट मर्टान

---

७) रिकाम्या जागा भरा : ....... आणि ....... यांनी घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावणी करण्याची जबाबदारी नगरपालिका आयुक्त यांची असते. त्यांची नियुक्ती ....... कडून केली जाते.

(1) नगरपरिषद, स्थायी समिती, केंद्र शासन (2) नगरपरिषद, स्थायी समिती, राज्य शासन

(3) नगरपरिषद, स्थायी समिती, स्थानिक शासन (4) स्थायी समिती, सचिव, राज्य शासन

---

८) सुस्पष्टपणे ठरविलेले कार्य विभाजन, अधिकार, जबाबदारी व उत्तरदायित्व यांच्यातून अस्तित्वात येणाऱ्या संघटनेस कार्य म्हणतात ?

(1) औपचारिक संघटना (2) अनौपचारिक संघटना (3) सामाजिक संघटना (4) बाह्य संघटना

---

९) 'एकी हेच बळ' हा अर्थ सांगणारी कोणती संज्ञा फेयॉल यांनी वापरली आहे ?

(1) समूहवृत्ती (2) एकता (3) एस्प्रिट डी कॉर्प्स (4) एस्प्रिट डी कार्टा

---

१०) व्यवस्थापनाची तत्त्वे कोणाला लागू होतात ?

(1) व्यवसाय संघटनांना (2) लष्करी संघटनांना (3) राजकीय संघटनांना (4) सर्व प्रकारच्या संघटनांना

---

११) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा :

i) निवृत्त होणारा महापौर किंवा उप–महापौर पुनर्निवडणुकीसाठी दोन्ही पदांसाठी पात्र नसेल.

ii) उपमहापौर त्यांच्या पदाचा लेखी राजीनामा केव्हाही महापौरांकडे देऊ शकतात.

iii) महापौर त्यांच्या पदाचा लेखी राजीनामा केव्हाही महानगरपालिकांकडे देऊ शकतात.

iv) महापौर आणि उपमहापौर, नवीन महापौर आणि उपमहापौर निवडून येईपर्यंत कारभार सांभाळू शकतात.

| | | | |
|---|---|---|---|
| (1) i) चूक | ii) बरोबर | iii) बरोबर | iv) बरोबर |
| (2) i) बरोबर | ii) बरोबर | iii) बरोबर | iv) बरोबर |
| (3) i) चूक | ii) चूक | iii) बरोबर | iv) बरोबर |
| (4) i) चूक | ii) चूक | iii) बरोबर | iv) चूक |

---

१२) कोणत्या समितीने स्थानिक संस्थांची त्रि–स्तरीय रचना असलेल्या लोकशाही विकेंद्रीकरणाच्या योजनेची शिफारस केली?

(1) अशोक मेहता (2) बलवंतराय मेहता (3) राजीव मेहता (4) सतीश चंद्र

---

१३) रिकामी जागा भरा :

भारतीय घटनेतील ७४ व्या दुरुस्तीनुसार नगरपालिकेच्या निवडणुका घेणे सक्तीचे आहे. ..........

(1) तिच्या विसर्जनाच्या तारखेपासून ९ महिन्यात (2) तिच्या विसर्जनाच्या तारखेपासून ४ महिन्यात

(3) तिच्या विसर्जनाच्या तारखेपासून ६ महिन्यात (4) तिच्या विसर्जनाच्या तारखेपासून ३ महिन्यात

---

१४) खालीलपैकी कोणता घटक स्थानिक शासन संस्थेच्या त्रि–स्तरीय संरचनेत समाविष्ट नाही ?
(1) खेडे (2) तालुका (3) जिल्हा (4) राज्य

---

*१५) नगरपालिकेच्या संदर्भात भारतीय घटनेत समाविष्ट करण्यात आलेल्या भाग IX-A नुसार खालील तरतुदींचे वर्गीकरण सक्तीच्या आणि ऐच्छिक अशा दोन भागात करा.*
*i) मागासवर्गीयांसाठी राखीव जागांची तरतूद करणे.*
*ii) नागरी संस्थांची रचना*
*iii) एकूण जागांच्या एक तृतीयांश जागा महिलांसाठी राखीव ठेवणे.*
*iv) कर, सीमाशुल्क, पथकर, शुल्क इत्यादींबाबत वित्तीय अधिकार देणे*
*(1) i) सक्तीचे ii) ऐच्छिक iii) सक्तीचे iv) ऐच्छिक*
*(2) i) ऐच्छिक ii) सक्तीचे iii) सक्तीचे iv) ऐच्छिक*
*(3) i) सक्तीचे ii) ऐच्छिक iii) ऐच्छिक iv) सक्तीचे*
*(4) i) ऐच्छिक ii) सक्तीचे iii) ऐच्छिक iv) सक्तीचे.*

---

१६) संघटनेच्या कोणत्या तत्त्वाप्रमाणे दुय्यमाने फक्त एकाच वरिष्ठाकडून आदेश घेतले पाहिजेत ?
(1) आदेशातील एकता (2) अधिकार साखळी (3) नियंत्रण क्षेत्र (4) विकेंद्रीकरण

---

१७) संघटनेच्या कोणत्या तत्त्वाप्रमाणे एका प्रकारच्या कार्य गटासाठी एकच योजना असली पाहिजे ?
(1) आदेशातील एकता (2) निर्देशनातील एकता (3) केंद्रीकरण (4) समता

---

१८) कोणत्या देशांमध्ये विकास प्रशासनाची लोकप्रियता सतत वाढत आहे ?
(1) विकसित (2) विकसनशील (3) श्रीमंत (4) मागासलेल्या

---

१९) भारतात कोणत्या साली जिल्हाधिकाऱ्यांचे पद निर्माण करण्यात आले ?
(1) १७७१ (2) १७७४ (3) १७७२ (4) १७७७

---

२०) संघटनेचे धोरण कोण निर्धारित करते ?
(1) प्रशासन (2) व्यवस्थापन (3) पर्यवेक्षक (4) कामगार

---

२१) पंचायत राज हा ग्रामीण स्थानिक शासनाचा प्रकार प्रथमत: कुणी अंगीकारला ? (अनुक्रमे)
(1) राजस्थान आणि आंध्र प्रदेश (2) राजस्थान आणि मध्य प्रदेश
(3) आंध्र प्रदेश आणि राजस्थान (4) राजस्थान आणि पश्चिम बंगाल

---

२२) खालीलपैकी कोणते 'विचाराचे कार्य' आहे ?
(1) व्यवस्थापन (2) अभिप्रेरण (3) पर्यवेक्षण (4) प्रशासन

---



Study CIRCLE

२३) खालीलपैकी कोणती जोडी योग्य प्रकारे जुळवलेली आहे ?
(1) जी.रामचंद्रन समिती – पंचात राज प्रशासन
(2) बलवंतराय मेहता समिती – पंचायत राज संस्था
(3) आर. के. खन्ना समिती – पंचायत राज निवडणुका
(4) जी. आर. राजगोपाल समिती – पंचायत राज प्रशासन

---

२४) हा नियंत्रण प्रकार कृती सुरु होण्यापूर्वीच त्यातील समस्यांचे अनुमान करतो ?
(1) फिडबॅक नियंत्रण
(2) फिड फॉरवर्ड नियंत्रण
(3) कृतीसह नियंत्रण
(4) तपासणी नियंत्रण

---

२५) रिकामी जागा भरा :
सुमारे१९५०–१९६० मध्ये विकास प्रशासन हे ........... चे उप–क्षेत्र म्हणून उदयास आले.
(1) लोक प्रशासन
(2) महानगरपालिका प्रशासन
(3) शासकीय प्रशासन
(4) सामाजिक प्रशासन

---

२६) कोणत्या तारखेस भारताचे संविधान स्वीकारण्यात आले ?
(1) २६ नोव्हेंबर १९४९
(2) २६ जानेवारी १९५०
(3) १५ ऑगस्ट १९४७
(4) ९ डिसेंबर १९४६

---

२७) खालील विधाने विचारात घ्या :
i) विकास प्रशासन आणि पारंपरिक प्रशासन यातील फरक अवास्तव, असमर्थनीय आणि अति साधा आहे.
ii) विकास प्रशासन आणि पारंपरिक प्रशासन हे दोन्ही एकमेकांना परस्परपूरक आहेत आणि एकदुसऱ्याविना टिकू शकणार नाही.

*आता खालील पर्यायांमधून योग्य उत्तराची निवड करा.*
(1) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण आहे.
(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण नाही.
(3) (i) हे चुकीचे आहे परंतु (ii) हे बरोबर आहे.
(4) (i) हे बरोबर आहे परंतु (ii) हे चुकीचे आहे

---

२८) कोणती संज्ञा एखादा व्यवस्थापक किती दुय्यमांचे कार्यक्षमपणे पर्यवेक्षण करू शकतो हे दर्शविते ?
(1) आदेश क्षेत्र
(2) निमंत्रण क्षेत्र
(3) निर्देशन क्षेत्र
(4) व्यक्तिगत क्षेत्र

---

२९) नियोजनातील खालील पायऱ्यांचा योग्य क्रम लावा.
i) ध्येयाची उद्दिष्टे ठरविणे.
ii) पर्यायाची निवड करणे.
iii) नियोजन विचारात घेणे.
iv) संधीबद्दल माहिती घेणे
v) अंदाजपत्रक बनवून योजनांना क्रमांक देणे.
vi) पर्यायांचा शोध घेणे.
vii) सहाय्यात्मक योजना तयार करणे.
viii) गाठावयाची ध्येये ध्यानात घेऊन पर्यायांची तुलना करणे.
(1) (iv), (i), (iii), (vi), (vii), (ii), (viii), (v)
(2) (iv), (i), (iii), (vi), (viii), (ii), (vii), (v)
(3) (iv), (i), (iii), (vi), (viii), (vii), (ii), (v)
(4) (iv), (i), (iii), (vi), (ii), (viii), (vii), (v)

---



study CIRCLE

३०) खालीलपैकी कोणते एक आधुनिक नियंत्रण तंत्र आहे ?
(1) थेट पर्यवेक्षण (2) वित्तीय पत्रके (3) अंदाजपत्रक (4) स्वयंनियंत्रण

---

३१) खालील घटकांचे (a) एकमात्र उपयोग योजना आणि (b) स्थायी योजना यामध्ये वर्गीकरण करा.
i) प्रक्रिया ii) नियम iii) डावपेच
iv) धोरणे v) उद्दिष्टे vi) पद्धती

| *(a) एकमात्र उपयोग योजना* | *(b) स्थायिक योजना* |
|---|---|
| (1) III, V | I, II, IV, VI |
| (2) III, I | I, IV, V, VI |
| (3) III, II | I, IV, V, VI |
| (4) III, IV | I, II, V, VI |

---

३२) महानगरपालिकेच्या निवडणुकीची अधिसूचना निर्गमित करण्याचा अधिकार कोणास आहे ?
(1) महापालिका आयुक्त (2) महापौर (3) राज्य निवडणूक आयुक्त (4) राज्याचे मुख्यमंत्री

---

३३) खालील विधाने विचारात घ्या :
i) सध्या संघटन कार्य अतिशय क्लिष्ट झाले असून प्रारंभीपेक्षा अधिक कष्टप्रद झाले आहे.
ii) आत्ताचा समाज अनेक घटकांनी प्रभावित झालेला आहे – तांत्रिक, नवीन बदललेला दृष्टिकोन, नवीन विचारसरणी प्रवाह, नवीन मूल्ये, नवीन समस्या.

आता खालील पर्यायातून बरोबर उत्तरांची निवड करा.
(1) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण आहे.
(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण नाही.
(3) (i) हे चूक आहे आणि (ii) बरोबर आहे
(4) (i) हे बरोबर आहे परंतु (ii) हे चुकीचे आहे.

---

३४) कोणत्या प्रकारच्या संघटन रचनेत अधिकार साखळीत स्तरांची संख्या फार जास्त असते ?
(1) समांतर (2) सपाट (3) ऊर्ध्व (4) कार्यात्मक

---

३५) संघटनात समाविष्ट असलेले चार घटक ओळखा.
(1) लोक, भांडवल, यंत्रसामग्री, जागा (2) कार्य, लोक भांडवल
(3) कार्य, लोक, भांडवल, प्रणाली (4) कार्य, लोक, माल, जागा

---

३६) भारताच्या घटनेचे कोणते कलम ग्राम पंचायतींच्या संघटनेची तरतूद करते ?
(1) १४ (2) ४० (3) ४१ (4) ४३

---

३७) रिकाम्या जागा भरा : अधिकार हा ....... अधिकार आहे आणि ....... अधिकार नाही.
(1) व्यक्तिगत, कायदेशीर (2) व्यक्तिगत, पदाधारित (3) पदाधारित, व्यक्तिगत (4) कायदेशीर, पदाधारित

---

३८) ''जन धोरणांची पूर्तता किंवा अंमलबजावणी करण्याचा हेतू असलेल्या सर्व कार्याचा लोकप्रशासनात समावेश होतो.'' ही व्याख्या कोणी केली आहे ?
(1) विल्सन (2) एन. डी. व्हाईट (3) डी. वाल्डो (4) एच. वॉकर

---

३९) खालील विधाने विचारात घ्या.
i) संघटनेतील कर्मचाऱ्यांमधील परस्पर संबंधांना चालना दिल्याशिवाय औपचारिक संघटनेचे व्यवस्थापन करणे अतर्क्य आहे
iii) अधिकार मोडणे म्हणजे संभवत: संघटनेमध्ये बिघाड किंवा संघटनेचे विघटन आणि ऱ्हास होय.
*आता खालील पर्यायांतून योग्य उत्तराची निवड करा.* –
(1) (i) बरोबर आहे परंतु (ii) चुकीचे आहे.
(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण नाही.
(3) (i) चुकीचे आहे परंतु (ii) बरोबर आहे.
(4) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण आहे.

---

४०) लुथर गुल्लिक यांनी निर्धारित केलेल्या संघटनाच्या चार आधारांमध्ये कोणाचा समावेश होत नाही ?
(1) कार्यक्रम (2) हेतू (3) प्रक्रिया (4) व्यक्ती

---

४१) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा : अधिकार प्रदानामुळे ............
i) हाताखालील कनिष्ठांना स्वत:चा विकास करण्याची सुसंधी प्राप्त होते.
ii) व्यवस्थापकाच्या कामाचा बोजा कमी होतो.
iii) व्यवस्थापकाच्या अनुपस्थितीत कामाच्या सातत्यात अडथळा येतो.
iv) उपक्रमांचा विस्तार करणे आणि त्यात विविधता आणणे यासाठी व्यवसाय संस्थेला प्रेरणा मिळते

| | | | | |
|---|---|---|---|---|
| (1) | i) बरोबर | ii) बरोबर | iii) चूक | iv) बरोबर |
| (2) | i) बरोबर | ii) बरोबर | iii) बरोबर | iv) बरोबर |
| (3) | i) बरोबर | ii) बरोबर | iii) चूक | iv) चूक |
| (4) | i) बरोबर | ii) चूक | iii) चूक | iv) बरोबर |

---

४२) मॅक्स वेबर यांनी सुचविलेल्या अधिकार प्रकारांपैकी कोणता नाही ?
(1) पारंपरिक अधिकार (2) रेखीय अधिकार
(3) करिष्मापूर्ण अधिकार (4) कायदेशीर विवेकपूर्ण अधिकार

---

४३) खालील विधाने विचारात घ्या :

i) एखादा व्यवस्थापक संख्येने किती व्यक्तीवर परिणामकारकपणे देखरेख करू शकेल आणि निर्णय घेऊ शकेल. यावर मर्यादा आहे.

ii) एकदा ही मर्यादा ओलांडली की कनिष्ठ कर्मचाऱ्यांना अधिकार प्रदान केलेच पाहिजेत.

*आता खालील पर्यायातून योग्य उत्तराची निवड करा.*

(1) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण नाही.

(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण आहे.

(3) (i) चूक आहे परंतु (ii) बरोबर आहे.

(4) (i) बरोबर आहे परंतु (ii) चूक आहे.

---

४४) ७४ व्या दुरुस्ती कायद्याने घटनेत अंतर्भूत केलेल्या बाराव्या अनुसूचीमध्ये नगरपालिकांच्या अधिकारकार्यात्मक बाबींचा समावेश केला आहे ?

(1) २८ (2) १८ (3) ३८ (4) ४८

---

४५) नियंत्रण प्रक्रियेतील खालील आवश्यक घटकांची पुनर्मांडणी करा –

i) उद्दिष्टे निश्चित करणे अथवा लक्ष्य ठरविणे.
ii) केलेल्या कार्याचे मोजमाप करणे.
iii) उपायात्मक कृती करणे.
iv) तुलना करणे.

(1) (i), (ii), (iv), (iii) (2) (i), (ii), (iii), (iv) (3) (iv), (i), (ii), (iii) (4) (iv), (ii), (i), (iii)

---

४६) भारतात नागरी भागांच्या प्रशासनासाठी किती नागरी स्थानिक संस्था निर्माण करण्यात आल्या आहेत ?

(1) ८ (2) ७ (3) ९ (4) ५

---

४७) खालील विधानातून बरोबर विधाने शोधा :

i) संकल्पनेच्या दृष्टीने नियंत्रण हे व्यवस्थापनाचे शेवटचे कार्य आहे.

ii) नियंत्रण ही सातत्याने चालणारी प्रक्रिया नाही कारण व्यवस्थापन प्रक्रिया चक्र ह्या कार्याने पूर्ण होते.

iii) नियंत्रण म्हणजे पुढे जाण्यासाठी लक्ष केंद्रित करणे आणि भविष्याची गती आणि स्वरूप यांना आकार देणे.

iv) नियंत्रणासाठी निकष आणि प्रमाणे आवश्यक नाही.

(1) (i), (iii) (2) (i), (ii) (3) (i), (iv) (4) (ii), (iii)

---

४८) कोणत्या राज्यात विकास प्रशासनाची जबाबदारी जिल्हा परिषदेकडे सोपविण्यात आली आहे ?

(1) महाराष्ट्र (2) तामिळनाडू (3) राजस्थान (4) आंध्र प्रदेश

---

४९) रिकामी जागा भरा :

........... यांना मानवी संबंध विचारसरणीचे जनक मानले जाते.

(1) फ्रेडरिक टेलर (2) एल्टन मेयो (3) हेन्री फेयॉल (4) चेस्टर बर्नार्ड

---

५०) ग्राम पंचायत खालील कर बसवू शकत नाही.
(1) इमारत कर (2) यात्रा कर (3) उत्पन्न कर (4) जत्रा कर

---

५१) तुम्हांला बरोबर वाटत असलेला फक्त एक पर्याय निवडा :
मानवी संबंधांची व्याख्या अशी करता येईल.
(1) समूहातील व्यक्तिगत वर्तनाचा अभ्यास
(2) मानसशास्त्रीय सिद्धांत आणि तत्त्वे कारखान्यास लागू करणे.
(3) संघटनेतील लोकांची पिळवणूक करणे.
(4) सांघिक कार्य वाढीस लावून व्यक्तिगत आणि संघटनात्मक ध्येय परिणामकारकपणे गाठण्यासाठी संघटनेतील लोकांना प्रेरणा देणे.

---

५२) ग्रामसभेच्या किमान किती सभा प्रत्येक आर्थिक वर्षात आयोजित केल्या पाहिजेत ?
(1) ४ (2) ६ (3) ३ (4) ८

---

५३) रिकाम्या जागा भरा : खऱ्या प्रतियोगी प्रशासनाची दोन आवश्यक वैशिष्ट्ये असली पाहिजेत; ते ....... असलेच पाहिजे आणि ........ असलेच पाहिजे.
(1) प्रातिनिधिक, सहृदय (2) प्रातिनिधिक, जबाबदार (3) जबाबदार, सहृदय (4) प्रातिनिधिक, उदारमतवादी

---

५४) ई–गव्हर्नन्समुळे कोणते फायदे मिळतात ?
(1) वेळेची बचत (2) खर्चाची बचत (3) श्रमाची बचत (4) वेळ, खर्च व श्रमाची बचत

---

५५) रिकामी जागा भरा : ........... प्रशासन सांकेतिक ही, तिहेरी रचना असून ती मोठ्या प्रमाणात लोकसेवकांचे लोकशाही विकेंद्रीकरण, विकेंद्रित नियोजन प्रक्रिया आणि जबाबदार यावर आधारित आहे.
(1) सहृदय (2) उदारमतवादी (3) प्रगती–प्रधान (4) प्रतियोगी

---

५६) जनता सरकार मुदतपूर्व कोसळल्यामुळे कोणत्या समित्यांच्या शिफारसीवर कृती करण्यात आली नाही ?
(1) बलवंतराय मेहता (2) अशोक मेहता (3) व्ही. आर. राव (4) के. संथानम

---

५७) खालील विधाने विचारात घ्या :
i) ई–गव्हर्नन्स ही संकल्पना ई–शासन यापेक्षा अधिक विस्तृत आहे.
ii) ई–गव्हर्नन्स नागरिकत्वाच्या नवीन संकल्पना नागरिकांच्या गरजा आणि जबाबदाऱ्या या स्वरूपात पुढे आणू शकते आणि त्याचे उद्दिष्ट आहे नागरिकांना सहभागी करून घेणे, समर्थ व सक्षम बनविणे.
अशा खालील पर्यायातून बरोबर उत्तम शोधा.
(1) (i) बरोबर आहे परंतु (ii) चुकीचे आहे.
(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण आहे.
(3) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण नाही.
(4) (i) चूक आहे आणि (ii) बरोबर आहे.

---

५८) कोणी अधिकाराचा स्वीकार्यता सिद्धांत मांडला ?

(1) वेबर (2) फेयॉल (3) टेलर (4) बर्नार्ड

---

५९) रिकामी जागा भरा : ई–गव्हर्नन्समधील महत्त्वपूर्ण आधारभूत संरचनेचे ....... मुद्दे आहेत आणि त्यामधील सुधारणांशिवाय परिणामकारक ई–गव्हर्नन्स कार्यक्रम अमलात आणणे शक्य नाही.

(1) कमकुवत ग्रामीण दूरसंचार जाळे (2) विजेच्या समस्या

(3) अपुरे नेटवर्क जोड (4) वरील सर्व

---

६०) भारतात नागरी स्थानिक संस्थांच्या महसुलाचे मुख्य स्रोत हे आहेत.

(1) कर (2) फी व दंड (3) अनुदाने व कर (4) सेवा आकार

---

६१) मनुष्यबळ, नियोजनात अमलात आणावयाच्या खालील पायऱ्यांची योग्य क्रमाने पुनर्मांडणी करा.

i) भविष्यकालीन संघटन रचना आणि मनुष्यबळाची गरज यांचा अंदाज बांधणे.

ii) ध्येय अथवा उद्दिष्टे ठरविणे.

iii) मानव संसाधन योजना तयार करणे.

iv) मानव संसाधनाची तपासणी करणे; आणि

v) कार्याच्या गरजा आणि कार्य वर्णन यांचे नियोजन करणे.

(1) (i), (ii), (iv), (v), (iii) (2) (i), (ii), (iv), (iii), (v)

(3) (iii), (i), (iv), (v), (iii) (4) (ii), (i), (v), (iv), (iii)

---

६२) कोणत्या प्रकारच्या मुलाखतीत सर्व उमेदवारांना सारखे प्रश्न विचारले जातात ?

(1) संरचित (2) असंरचित (3) समूह (4) वर्तनात्मक

---

६३) खालील विधाने बरोबर आहेत की चूक ते सांगा :

मनुष्यबळ नियोजनाची गरज खालील बाबींसाठी असते.

i) विस्तार कार्यक्रमाच्या गरजा भागवणे.

ii) कर्मचारी उलाढाल थांबविणे.

iii) नवीन आणि बदलत्या आव्हानांना सामोरे जाणे.

iv) संघटनेची उद्दिष्ट गाठण्याची क्षमता राखणे आणि त्यात सुधारणा करणे.

(1) i) बरोबर ii) बरोबर iii) चूक iv) बरोबर

(2) i) बरोबर ii) चूक iii) बरोबर iv) बरोबर

(3) i) चूक ii) बरोबर iii) बरोबर iv) बरोबर

(4) i) चूक ii) चूक iii) बरोबर iv) बरोबर

---

६४) खालील पद्धतींपैकी कोणती पद्धत कार्यावर प्रशिक्षणासाठी वापरली जाते ?

(1) शिकाऊ उमेदवारी (2) व्याख्यान (3) समूह चर्चा (4) परिषद

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

६५) बरोबर की चूक ते सांगा:

i) कर्मचारी भरतीचे बहिर्गत स्त्रोत कर्मचाऱ्यांचे मनोबल खालावतात.

ii) कर्मचारी भरतीच्या बहिर्गत स्त्रोतामधून ताजीतवानी बुद्धी आणि कौशल्य संघटनेत येते.

iii) कॅम्पस मुलाखतीमध्ये वशिलेबाजी आणि नातेसंबंधांची गटबाजी यांचा धोका असतो.

iv) काम कायमस्वरूपी असेल तेव्हा साधारणत: कर्मचारी कंत्राटदाराची मदत घेतली जाते.

(1) i) बरोबर ii) बरोबर iii) बरोबर iv) बरोबर
(2) i) बरोबर ii) बरोबर iii) बरोबर iv) चूक
(3) i) चूक ii) बरोबर iii) चूक iv) बरोबर
(4) i) बरोबर ii) बरोबर iii) चूक iv) बरोबर

---

६६) अभिप्रेरणाचा द्वि–घटक सिद्धांत कोणी सुचविला ?

(1) मास्लो (2) हर्झबर्ग (3) ब्रूम (4) मॅकग्रेगर

---

६७) कर्मचारी भरतीच्या प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्ष पद्धती अशामध्ये खालील मुद्यांचे वर्गीकरण करा.

i) वर्तमान पत्रातील जाहिरात
ii) रेडिओवरील जाहिरात
iii) फिरते भरती करणारे
iv) व्यापार आणि व्यावसायिक जनरलमध्ये जाहिरात
v) व्यावसायिक संस्था
vi) मासिके आणि माहिती पत्रकातील जाहिरात
vii) कर्मचाऱ्यांचे जनतेशी संबंध.

(1) प्रत्यक्ष पद्धती – (iii),(v), (vii) अप्रत्यक्ष पद्धती – (i), (ii), (iv), (vi)
(2) प्रत्यक्ष पद्धती – (i), (v), (vii) अप्रत्यक्ष पद्धती – (ii), (iii), (iv), (vi)
(3) प्रत्यक्ष पद्धती – (iii), (v), (vi) अप्रत्यक्ष पद्धती – (i), (ii), (iv), (vii)
(4) प्रत्यक्ष पद्धती – (i), (iii), (v) अप्रत्यक्ष पद्धती – (i), (iv), (vi), (vii)

---

६८) रतन टाटा यांचे वर्णन कसे करता येईल ?

(1) व्यवस्थापक (2) नेतृत्वकर्ता (3) कार्यकारी अधिकारी (4) सामाजिक कार्यकर्ता

---

६९) रिकामी जागा भरा. प्रगती मूल्यमापन ही कर्मचाऱ्यांच्या सध्याच्या च्या कामाचे ........ आणि भविष्यकालीन कामासाठी त्याची संभाव्यता मूल्यमापन करणारी पद्धत होय.

(1) ठरावीक मुदतीची आणि दोष शोधणारी
(2) प्रासंगिक आणि नि:पक्षपाती प्रतवारी करणारी
(3) ठरावीक मुदतीची आणि मर्मज्ञ प्रतवारी करणारी
(4) वरीलपैकी कोणतीही नाही.

---

७०) मास्लो यांनी सुचविलेल्या गरजांच्या उतरंडी मधील पहिली गरज कोणती ?

(1) शारीरिक गरज (2) सुरक्षा गरज (3) सामाजिक गरज (4) प्रशंसेची गरज

---

७१) प्रगती मूल्यमापनातील खालील पायऱ्यांची योग्य क्रमाने पुनर्मांडणी करा.
i) प्रगतीप्रमाणे निश्चित करा
ii) प्रगतीच्या अपेक्षा कर्मचाऱ्यांना कळवा
iii) प्रत्यक्ष प्रगतीचे मोजमाप करा
iv) कर्मचाऱ्याबरोबर प्रगतीबाबत चर्चा करा.
v) प्रत्यक्ष प्रगतीची तुलना प्रमाणांबरोबर करा.
vi) गरज असल्यास दुरुस्ती करा.
(1) (i), (ii), (iii), (v), (iv), (vi)
(2) (i), (ii), (iii), (iv), (v), (vi)
(3) (i), (ii), (iii), (vi), (iv), (v)
(4) (i), (ii), (iv), (iii), (v), (vi)

---

७२) लिकर्ट यांनी किती नेतृत्वशैलीच्या पद्धती सुचविल्या आहेत ?
(1) ३ (2) ७ (3) ४ (4) ९

---

७३) शिस्तभंग कारवाईच्या प्रक्रियेसाठी अचूक क्रम निवडा.
i) आरोपपत्र
ii) स्पष्टीकरण
iii) निलंबन
iv) चौकशी
v) चौकशी
vi) अपील
vii) शिस्त अधिकार समितीचा अंतिम निर्णय
(1) (i), (ii), (iii), (v), (vii), (vi)
(2) (i), (iii), (ii), (vi), (v), (vi), (vii)
(3) (i), (ii), (iii), (iv), (v), (vii), (vi)
(4) (i), (ii), (ii), (v), (iv), (vii), (vi)

---

७४) जेथे जागेचा किंवा वेळेचा विचार न करता सदस्यांना एकमेकांशी भेटता येते अशा संघास काय म्हणतात?
(1) कार्यात्मक (2) व्हर्च्युअल संघ (3) व्हर्टिकल संघ (4) क्वालिटी सर्कल

---

७५) रिकामी जागा भरा : स्वीकृत किंवा अपेक्षित निकष याचा भंग करणारे वर्तन म्हणजे ........
(1) बेशिस्त (2) शिक्षेस पात्र कृती (3) दुर्वर्तन (4) चुकीचे वर्तन

---

७६) विशिष्ट भविष्यकाळासाठी संख्यात्मक रूपात तयार केलेल्या योजनेला काय म्हणतात ?
(1) कार्यक्रम (2) अंदाजपत्रक (3) उत्पन्न पत्रक (4) बृहत आराखडा

---

७७) रिकाम्या जागा भरा :
विशिष्ट कार्य करण्यासाठी ज्ञान संवर्धन करण्याची कृती म्हणजे ........... म्हणजे व्यक्तीची सर्वांगीण वाढ.
(1) शिक्षण, प्रशिक्षण (2) प्रशिक्षण, विकास (3) प्रशिक्षण, शिक्षण (4) विकास, शिक्षण

---

७८) कोणत्या प्रकारचे बजेट हे विविध सरकारी कामकाजाच्या भौतिक व वित्तीय घटकांचे एकत्रीकरण करून आदाने व प्रदाने यांच्यात अर्थपूर्ण संबंध प्रस्थापित करते ?
(1) शून्याधारित बजेट (2) कामगिरी बजेट (3) वित्तीय बजेट (4) आयटम सूची बजेट

---

७९) खालील बाबींचे वर्गीकरण (I) सेवांतर्गत प्रशिक्षण आणि (II) सेवाबाह्य प्रशिक्षण यामध्ये करा.

i) व्याख्यान व चर्चा
ii) मार्गदर्शन
iii) परिषद प्रशिक्षण
iv) अध्ययन (वरिष्ठाच्या हाताखाली)
v) केस स्टडी
vi) पद अदलाबदल

(1) सेवांतर्गत प्रशिक्षण – (i), (ii), (iv) सेवाबाह्य प्रशिक्षण – (iii), (v), (vi)
(2) सेवांतर्गत प्रशिक्षण – (i), (ii), (vi) सेवाबाह्य प्रशिक्षण – (iii), (iv), (v)
(3) सेवांतर्गत प्रशिक्षण – (iv), (v), (vi) सेवाबाह्य प्रशिक्षण – (i), (ii), (iii)
(4) सेवांतर्गत प्रशिक्षण – (ii), (iv), (vi) सेवाबाह्य प्रशिक्षण – (i), (iii), (v)

---

८०) कोणत्या फ्रेंच शब्दावरून 'बजेट' ही संज्ञा तयार करण्यात आली आहे ?
(1) बुगेट (2) बुके (3) बुगोटा (4) बजेटो

---

८१) नेतृत्वविषयक संशोधनाच्या अभ्यासातून काढलेल्या अनुमानांच्या आधारे, यशस्वी नेतृत्वाचे गुण वर्गीकरण .......... मथळ्यांखाली करता येईल.
(1) व्यक्तिगत गुणवैशिष्ट्ये (2) ज्ञान आणि क्षमता (3) कौशल्ये (4) वरील सर्व

---

८२) शिस्तभंगाच्या प्रक्रियेतील पहिला टप्पा कोणता ?
(1) आरोपपत्र देणे (2) चौकशी सूचना (3) सेवा समाप्ती (4) सेवा स्थगिती

---

८३) नेतृत्वाची प्रमुख कार्ये याप्रमाणे करता येतील
(1) कर्मचाऱ्यांना प्रेरणा देणे (2) कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करणे.
(3) पोषक वातावरण निर्माण करणे. (4) वरील सर्व

---

८४) कोणती चाचणी अर्जदारांच्या कार्यासंबंधी संबंधित प्रभुत्वाचे मापन करते ?
(1) बुद्धिमत्ता चाचणी (2) कल चाचणी (3) सिद्धी चाचणी (4) परिस्थितीजन्य चाचणी

---

८५) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा. महानगरपालिका अंदाजपत्रक तयार करताना –
i) अंदाजपत्रकामध्ये सर्व जमा व खर्चाचा समावेश करू नका.
ii) संतुलित अंदाजपत्रकाचा अवलंब करा.
iii) समाज संघटना अथवा व्यक्तींना पैसे उसने द्यायला परवानगी आहे.
iv) महसुली खर्चाच्या सहाय्यासाठी पैसा उधारीने आणण्यासाठी परवानगी नाही.

(1) i) चूक ii) बरोबर iii) चूक iv) बरोबर
(2) i) बरोबर ii) चूक iii) चूक iv) बरोबर
(3) i) बरोबर ii) बरोबर iii) चूक iv) बरोबर
(4) i) चूक ii) बरोबर iii) चूक iv) चूक

---

८६) खालीलपैकी कोणती पद्धत ही कार्याबाहेरील प्रशिक्षणाची पद्धत आहे ?
(1) उमेदवारी (2) समिती (3) कार्यसूचना (4) प्रतिकृतीद्वारे प्रशिक्षण

---

८७) खालीलपैकी कोणते विधान चुकीचे आहे ?
(1) अंदाजपत्रक तयार करण्यासाठीचा आधार म्हणजे विविध अधिकाऱ्यांकडून प्राप्त झालेले इनपुट.
(2) अंदाजपत्रक तयार करण्याचा आधार हा 'खालून वर' विचाराचा असेल.
(3) सर्वोच्च युनिटकडून अंदाज बांधले जातील आणि मुख्य कचेरीत संकलित केले जातील.
(4) संकलित अंदाजपत्रक सारांश स्वरूपात सादर केले जाईल.

---

८८) अभिप्रेरणाचा 'क्ष' सिद्धांत आणि 'य' सिद्धांत कोणी सुचविला ?
(1) डग्लस मॅक्ग्रेगर (2) अब्राहम मास्लो (3) विल्यम औची (4) हर्झबर्ग

---

८९) खालील विधाने विचारात घ्या :
i) परफॉर्मन्स अंदाजपत्रकाला ठरावीक मर्यादा आहेत.
ii) अंदाजपत्रक प्रक्रियेतील प्रशासकीय उणिवांबाबत त्यातून कोणताच उपाय मिळत नाही.
आता खालील पर्यायातून योग्य उत्तराची निवड करा.
(1) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे बरोबर स्पष्टीकरण आहे.
(2) (i) आणि (ii) दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण नाही.
(3) (i) चूक आहे परंतु (ii) बरोबर आहे.
(4) (i) बरोबर आहे परंतु (ii) चूक आहे.

---

९०) एखाद्या कर्मचाऱ्यावर बेशिस्तीच्या कृत्याबद्दल घेतलेली मवाळ कृती कोणती ?
(1) लेखी इशारा (2) तोंडी इशारा (3) पगार कपात (4) पदावनती

---

९१) शून्याधारित अंदाजपत्रकाच्या गरजा खालील बाबींमधून शोधा :
i) उद्दिष्टे निश्चित करणे आणि मर्मभेदक बनविणे.
ii) उद्दिष्टे आणि कार्यक्रम यांचा अग्रक्रम बनविणे.
iii) व्यय–लाभ आणि व्यय–परिणामकारकता यांच्या माध्यमातून सर्वोत्कृष्ट पर्यायाची निवड करणे.
iv) गतकाळात मान्य झालेल्या योजना आणि कार्यक्रम पुढील कोणतेही परीक्षण न करता तसेच चालू ठेवणे
(1) (i), (ii), (iv) (2) (ii), (iii), (iv) (3) (i), (ii), (iii) (4) (i), (iii), (iv)

---

९२) 'ऑडिट' हा शब्द कोणत्या लॅटिन शब्दावरून घेण्यात आला आहे ?
(1) ऑडिरे (2) ऑडिटे (3) ऑडिका (4) ऑडिने

---

९३) खालील विधाने विचारात घ्या :

i) ज्या संघटनांमध्ये शून्याधारित अंदाजपत्रक अमलात आणले जाते अशा काही संघटनांमध्ये विविध विभाग बचत दाखवायला नाखूष असतात.

ii) त्यांना असे भय वाटते की जी रक्कम वाचवलेली आहे ती रक्कम अन्य खात्याकडे वर्ग करण्यात येईल.

*आता खालील पर्यायातून योग्य उत्तर निवडा.*

(1) (i) हे चूक आहे परंतु (ii) हे बरोबर आहे.

(2) (i) हे बरोबर आहे परंतु (ii) हे चूक आहे.

(3) (i) आणि (ii) हे दोन्ही बरोबर आहेत परंतु (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण नाही.

(4) (i) आणि (ii) हे दोन्ही बरोबर आहेत आणि (ii) हे (i) चे योग्य स्पष्टीकरण आहे.

---

९४) सरकारी हिशोबाच्या अंकेक्षण साखळीतील सर्वोच्च अधिकारी व्यक्ती कोण आहे ?

(1) ऑडिटर जनरल
(2) वैधानिक अंकेक्षक
(3) वित्त मंत्री
(4) कंप्ट्रोलर आणि ऑडिटर जनरल ऑफ इंडिया

---

९५) खालील विधाने चूक की बरोबर ते सांगा.

